भंडारा जिल्हा पोलीस

प्रेस नोट

दि. 14 / 11 / 2026

स्थानिक गुन्हे शाखेच्या एन.डी.पी.एस. पथकाची लाखनीत 15.406 किलो डोडा भुकटीवर कारवाई; एकुण 11,10,620/- रु. चा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन लाखनी अंतर्गत दिनांक–13 / 11 / 2026 रोजी एन.डी.पी.एस. पथक स्थानिक गुन्हे शाखा भंडारा यांनी गोपनीय माहितीच्या आधारे मौजा गुंथारा येथे आरोपी (1) विलास मोरेश्वर ढेंगे वय 43 वर्ष रा. गुंथारा याने त्याचे राहते घरी अवैधरित्या अमली पदार्थ डोडा भुकटी (poppy straw) बाळगून ठेवल्याने त्याचे सह आरोपी (2) प्रफुल उर्फ सोनू निंबार्ते वय 32 वर्ष रा. गुंथारा यांना ताब्यात घेऊन आरोपी क्रमांक (1) यास मिळालेल्या मुद्देमाल बाबत विचारपूस केली असता त्याने सदरचा मुद्देमाल हा आरोपी क्र (3) रामराम गंगाराम चौधरी वय अंदाजे 37 वर्षे करा चौधरी राजस्थानी धाबा रा.दिघोरी / आमगाव याचे मालकीचा असल्याचे सांगितले. त्यामध्ये आरोपी क्र 1, 2, 3 यांना ताब्यात घेऊन त्यांच्या अंगझडती व घरझडतीत (1) 15.406 किलोग्राम अमली पदार्थ अफु डोडा भुकटी किंमती 3,08,120 / –रु (2) दोन अँड्रॉइड मोबाईल किंमती 45,000 / – रुपये (3) एक चार चाकी बुलेरो पिकअप आणि एक मोटर सायकल 7,50,000 / –रू (4) दोन मिक्सर ग्राइंडर व पॉट किंमती 3,800 / – रुपये (5) दोन वजन काटे किंमत 3,700 / – असा एकूण 11,10,620 / – रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीता क्रमांक विरुद्ध पो.स्टे. लाखनी येथे अपराध क्र. 556 / 2026 कलम 8(ब),15(इ) 29 NDPS ACT अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नूरुल हसन सा., मा. अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे सा., पो.नि. गायकवाड सा. यांच्या मार्गदर्शनात सपोनी. लांडे, स्था.गु.भा. यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन लाखनी चे अधिकारी करीत आहेत.

